अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३.११.२०२६

जिल्हा : सांगली

मागील आठवड्यातील हवामान (२८.१०.२०२६ ते ०३.११.२०२६)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४.११.२०२६ ते ०८.११.२०२६)				
२८	२९	३०	३१	०१	०२	०३	दिनांक	०४	०५	०६	०७	०८
-	-	-	-	-	-	-	पाऊस (मिमी)	४	२	०	०	०
-	-	-	-	-	-	-	कमाल तापमान (अं.से.)	३४	३३	३४	३४	३४
-	-	-	-	-	-	-	किमान तापमान (अं.से.)	२४	२३	२२	२१	१९
-	-	-	-	-	-	-	ढग स्थिती (आकाश)	५	६	७	३	३
-	-	-	-	-	-	-	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८३	८०	८३	७८	६०
-	-	-	-	-	-	-	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	५८	६३	५६	५२	४६
-	-	-	-	-	-	-	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	९	१०	१२	१२	१५
-	-	-	-	-	-	-	वाऱ्याची दिशा	पू.ई.	ऊ.	ऊ.	पू.	पू.ई.

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये ४, ५, ६, ७ व ८ नोव्हेंबर रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **सांगली जिल्ह्यामध्ये ४ व ५ नोव्हेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये ८ नोव्हेंबर पर्यंत कमाल तापमान ३३.० ते ३४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १९.० ते २४.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ६० ते ८३%, दुपारची सापेक्ष आद्रता ४६ ते ५८% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते १५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
विस्तारित श्रेणी अंदाज		विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ८ ते १४ नोव्हेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला		➢ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी. ➢ फळे व भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा ➢ रब्बी पिकांसाठी सरी ओरंबा तसेच रुंद वरंबा सरी पद्धतीचा (बि.बि.एफ) अवलंब करावा ➢ ऊस तोडणीनंतर राहणारी धसकटे वेचून घेऊन बाहेर शेताबाहेर टाकावीत
संदेश		➢ **फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये शक्य असल्यास आच्छादनांचा वापर करावा आच्छादनासाठी ऊसाच्या पाचटाचा वापर करावा**
गहू	पेरणी	➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री असल्यासच शेतकरी बंधु १० नोव्हेंबरपर्यंत गहू पिकाची पेरणी करू शकतात ➢ बागायती गव्हाची पेरणी वेळेवर करण्यासाठी फुले समाधान, फुले अनुपम, फुले सात्विक, एम,ए,सी.एस ६२२२, एन.आय.ए.डब्ल्यु ११४९ या वाणांची निवड करावी ➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम ७५% डब्ल्यू. एस. या बुरशी नाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी तसेच गहू पिकावरील मावा, तुडतुडे आणि खोडमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम ७० डब्ल्यु. पी. १७.५ मिली प्रती १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. बुरशीनाशकाची व कीटकनाशकाची बीजप्रक्रिया करून बियाणे वाळवल्यानंतर प्रती किलो बियाण्यास २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धन खताची बीजप्रक्रिया करावी त्यामुळे उत्पादनात १० ते १५ % वाढ होते.
मका	पक्वता / पेरणी	➢ पक्व झालेल्या पिकाची काढणी करावी व काढणी व मळणी करून तयार शेतीमाल सुरक्षित ठेवावा ➢ रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता असल्यासच मका लागवड १५ नोव्हेंबर पर्यंत करावी ➢ मका पिकाच्या पेरणीसाठी लवकर पक्व होणाऱ्या सुधारित वाणांची निवड करावी. मका पिकाची पेरणी ७५ × २० सें.मी. अंतरावर करावी. ➢ पेरणीच्या वेळी ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व २८ किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकरी या प्रमाणात द्यावे. ➢ पेरणीपूर्वी बियाण्यास क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ५०% एफ.एस. औषधाची ५ मि.ली. प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. ➢ मका पेरणीनंतर लगेच किंवा दुसऱ्या दिवशी शिफारशीत अॅट्राझीन हे तणनाशक ५०० ग्रॅम प्रति २०० लिटर पाणी प्रति एकर या प्रमाणात मिसळून जमिनीवर फवारणी करावी. ➢ मका पिकाची उगवण झाल्यानंतर एका आठवड्याच्या आत लष्करी अळीच्या सर्व्हेक्षणासाठी एकरी ५ कामगंध सापळे लावावेत.
ऊस	शाकिय वाढ	➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री असल्यासच पूर्वहंगामी ऊस लागवड करावी ➢ पाण्याची उपलब्धता लक्ष्यात घेऊन आडसाली उस लागवडिस ६ ते ८ आठवडे झाले असल्यास नत्राचा दूसरा हप्ता देण्यासाठी १३९ किलो युरिया म्हणजे ३.०९ पोती युरिया प्रती एकरी या प्रमाणात द्यावा ➢ ऊस पिकास पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा आणि ठिबक सिंचनाद्वारे पाण्यात विरघळणारी खते द्यावीत. ➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उसाची खालची वाळलेली पाने काढून त्यांचा आच्छादनासाठी वापर करावा.

		➢ ऊस पिकास एक सरी आड पाणी द्यावे. ➢ उसाचे पाचट जाळू नये. शक्यतो त्याचा आच्छादनासाठी वापर करावा. पाचट लवकर कुजण्यासाठी कुजविणाऱ्या सूक्ष्मजीव संवर्धकाचा वापर करावा. त्यामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थांची भर पडेल.
सोयाबीन	**पक्वता**	➢ सोयाबीनच्या शेंगांचा रंग पिवळसर तांबूस झाल्यानंतर, वाणाच्या पक्वता कालावधीनुसार साधारणतः १०० ते ११० दिवसांत काढणी करावी. काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटून दाण्यांची गळ होऊ शकते. धारदार विळ्याच्या साहाय्याने पिकाची जमिनीलगत कापणी करावी व काढणी केलेले पीक त्वरित सुरक्षित, कोरड्या ठिकाणी ठेवावे. ➢ बियाण्यासाठी सोयाबीनची मळणी करताना मळणी यंत्राच्या शाफ्टची गती ४०० आर.पी.एम.पेक्षा कमी ठेवावी. गती जास्त असल्यास बियाणे फुटून त्याची गुणवत्ता व उगवणक्षमता कमी होऊ शकते. ➢ साठवणुकीपूर्वी बियाणे २ ते ३ दिवस उन्हात चांगले वाळवावे. बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के राहील याची काळजी घ्यावी, जेणेकरून साठवणुकीदरम्यान बुरशीचा प्रादुर्भाव होणार नाही. ➢ साठवणुकीसाठी स्वच्छ व कोरड्या गोण्यांचा वापर करावा. गोण्यांची थप्पी लावताना एकावर एक तीनपेक्षा जास्त गोण्या ठेवू नयेत. ➢ जमिनीतील ओलावा गोण्यांना लागू नये म्हणून लाकडी फळ्या किंवा पॅलेटवर गोण्यांची थप्पी लावावी. ➢ वाहतुकीदरम्यान गोण्या आपटणार नाहीत किंवा उंचावरून पडणार नाहीत याची काळजी घ्यावी, जेणेकरून बियाण्याचे नुकसान टाळता येईल.
भुईमुग	**पक्वता**	➢ भुईमुग पीक पक्व झाल्यास पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. पक्व झालेल्या पिकाची वेळेत काढणी करावी. तोडणी केलेल्या शेंगा पुरेशे ऊन पडताच उन्हात वाळवाव्यात व कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. शेंगांची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये.
हरभरा	**पेरणी**	➢ खात्रीशीर पाण्याची उपलब्धता असल्यासच बागायती हरभरा १० नोव्हेंबर पर्यंत करावी ➢ पेरणीकरता विजय, विशाल, दिग्विजय,फुले विक्रम, फुले विक्रांत आणि फुले विश्वराज या मर रोगास प्रतिकारक्षम असलेल्या वाणांची निवड करावी ➢ बिजप्रक्रीया करणे अत्यंत महत्त्वाचे असुन खरीप हंगामातील सोयाबीन पीक निघाल्यानंतर मुळ कुज व मान कुज या रोगापासून संरक्षण होण्यासाठी ट्रायकोडर्मा हरजियानाम १.०% डब्ल्यू. पी. ६ ग्रॅम प्रति किलो बीजप्रकियेसाठी तसेच आळवणीसाठी लागवडीनंतर ५० दिवसांनी वापरावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून चोळावे. असे बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. यामुळे पिकाचे रोप अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होते. मुळावरील नत्राच्या ग्रंथी वाढतात आणि पिकाची वाढ चांगली होते. ➢ हरभऱ्यावरील घाटे आळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २०० ग्रॅम ज्वारी हरभरा पेरताना मिसळून पेरावी
हळद	**कंद वाढीची**	➢ मागील आठवड्यातील ढगाळ व दमट हवामानामुळे काही ठिकाणी पानांवरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. रोगाच्या नियंत्रणासाठी अॅझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% + डायफेनोकोनॅझोल ११.४% एससी @ १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. ➢ काही भागांत कंदकुज रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी रोगग्रस्त कंद उपटून शेताबाहेर नेऊन नष्ट करावेत. तसेच, ट्रायकोडर्मा ४ किलो व पीएसबी (स्फुरद विरघळविणारे जीवाणू) २ किलो प्रति एकर या प्रमाणात आळवणी करावी.
द्राक्ष	**फळ छाटणीनंतरची नवीन फुटींची सक्रिय वाढीची अवस्था**	➢ या काळात तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून येऊ शकतो. अशा वेळी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ४.९ सीएस २०० मिली प्रति एकर, किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल १६० मिली प्रति एकर, किंवा फिप्रोनिल ८० डब्ल्यूजी २५ ग्रॅम प्रति एकर यांपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. अधिक चांगल्या परिणामांसाठी ही फवारणी रात्रीच्या वेळी करावी; तसेच ट्रॅक्टरच्या मागे पांढऱ्या रंगाचा बल्ब लावून तो फवारणीदरम्यान सुरू ठेवावा. द्राक्ष बागेत आणि बागेच्या आसपास असलेले तण काढून टाकावे. बागेत तुडतुड्यांना पकडून नष्ट करण्यासाठी जमिनीलगत पिवळे चिकट सापळे लावावेत.
आंबा	**नवीन पालवी**	➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ व जास्त आद्रतायुक्त हवामान असल्याने काही ठिकाणी आंब्यामधील नवीन पालवीवर तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी आंबा फळझाडावर इमिडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल. ३ मिली किंवा लॅम्डा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
पशुधन	**वाढीची**	➢ जनावरांना लाळ्या खुरकत रोगापासून बचावासाठी तज्ञ पशूवैदकाच्या सल्ल्याने निरोगी जनावरांना लसीकरण करून घ्यावे ➢ पुढील हंगामासाठी चाऱ्याचे नियोजन करण्यासाठी भात मळणी नंतरचा पेंढा, सोयाबीनचा भुसा सुरक्षित ठिकाणी साठवावा

मेघदूत अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे	**दामिनी** अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०३.११.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर